# नवीन वीज निर्मिती

७ जुलै २००९

रूपाली घाटे

GreenEarth

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(विजेच्या नीलप्रतसाठी)

# नवीन वीज निर्मिती

महाराष्ट्रात सध्या अनेकविध प्रकारचे वीज निर्मिती प्रकल्प होऊ घातले आहेत (सोबतची यादी पहा). यात जुन्या केंद्रांचे नूतनीकरण, राज्य शासनाने योजिलेले नवीन प्रकल्प, तसेच खासगी प्रकल्पाचाही समावेश आहे. यातले बरेच प्रकल्प २०१२ साली कार्यान्वित होतील तर १-२ प्रकल्प २०१४ साली.

म्हणजेच येत्या काही वर्षातच महाराष्ट्राला शासनाच्या प्रकल्पांतून १२,९०५ MW तर खासगी क्षेत्रातून २०,५९० MW अशी एकूण ३३,४९५ MW अतिरिक्त वीज प्राप्त होईल.

यात केंद्रांच्या नवीन प्रकल्पांतून राज्याला मिळणाऱ्या वाटयाचा समावेश नाही.

हे वाटते तितके सोपे नाही. प्रत्यक्षात यापुढे कैक जास्त वेळ हे प्रकल्प पूर्ण होण्यास लागणार आहे. कारण ह्या प्रकल्पांसाठी मोठया प्रमाणात जमिन संपादित करण्याची आवश्यकता आहे जी सहज मिळणे दुर्मिळ आहे. या प्रकल्पांमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे स्थानिक लोकांचा या प्रकल्पांना विरोध आहे (पहा टिप्पणी क्र. ८).

या सर्व कारणांमुळेच यातले काही प्रकल्प गेल्या काही वर्षांपासून रखडले आहेत.

विजेच्या बाबतीत शासनाला वेगळ्या धोरणाचा म्हणूनच विचार करण्याची आवश्यकता आहे, जो आपल्या निलप्रतीत आपण मांडला आहे.

## संदर्भ १

State Transmission Utility Plan  for the year 2009-10 to 2013-14

### Table – 3.3 – Proposed Year wise Generation addition by MSPGCL

| Installed Capacity | MW ( Ex-Bus Generation) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 2009-10 | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 |
| Parli TPS 2 (1x250) | 225 | - | - | - | - |
| Paras 2 (1x250) | 225 | - | - | - | - |
| Uran B1 (1x814) | - | - | 733 | - | - |
| Uran B2 (1x406) | - | - | 366 | - | - |
| Bhusawal 1 (1x500) | - | 450 | - | - | - |
| Bhusawal 2 (1x500) | - | 450 | - | - | - |
| Khaparkheda Expn. (1x500) | - | 450 | - | - | - |
| Parli Rep. (1x250) | - | - | 189 | - | - |
| Paras Rep. (1x250) | - | - | - | 176 | - |
| Bhusawal Rep. (1x250) | - | - | - | 176 | - |
| Chandrapur Unit I (1x500) | - | - | 450 | - | - |
| Chandrapur Unit II (1x500) | - | - | 450 | - | - |
| Koradi Unit I (1x660) | - | - | - | - | 594 |
| Koradi Unit II (1x660) | - | - | - | - | 594 |
| Koradi Unit III (1x660) | - | - | - | - | - |
| **Total** | **450** | **1350** | **2188** | **352** | **1188** |
| **Existing Generation** | **7767** | **8217** | **9567** | **11755** | **12107** |
| **Year wise Generation Availability** | **8217** | **9567** | **11755** | **12107** | **13295** |

# संदर्भ २

**सकाळ १९ ऑगस्ट २००९**

**११ हजार मेगावॉट वीजनिर्मितीची 'महानिर्मिती'ची योजना**

**सकाळ वृत्तसेवा** - Wednesday, August 19th, 2009 AT 10:08 PM

मुंबई - विजेची गरज भागविण्यासाठी वीजनिर्मितीबाबत खासगी क्षेत्रावर अवलंबून राहण्याची किंमत देशाबरोबरच महाराष्ट्राने गेली नऊ वर्षे भारनियमनाच्या रूपात मोजली. त्यामुळे या अनुभवावरून धडा घेऊन विजेची गरज भागविण्यासाठी महानिर्मिती या राज्य सरकारी वीज कंपनीमार्फत जवळपास ५५ हजार कोटी रुपये गुंतवणुकीतून ११ हजार मेगावॉट विजेची निर्मिती करण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. पैकी सध्या ३,२१० मेगावॉट क्षमतेच्या प्रकल्पांचे काम सुरू आहे.

राज्याला भारनियमनातून मुक्त करण्यासाठी ऊर्जा खात्यातर्फे वीजप्रकल्प उभारण्याचे काम गेली पाच वर्षे सुरू होते. वीज मंडळाचे त्रिभाजन झाल्यानंतर "महानिर्मिती"च्या माध्यमातून त्यास चालना मिळाली. सध्या ३,२१० मेगावॉट क्षमतेचे प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे; त्यात नवीन परळी टप्पा-२ व ३, तसेच पारस टप्पा-२ असे प्रत्येकी २५० मेगावॉट क्षमतेचे वीजनिर्मिती संच उभारण्यात येत आहे. खापरखेडा येथे ५०० मेगावॉट क्षमतेचा एक, भुसावळ येथे प्रत्येकी ५०० दोन व चंद्रपूर येथेही ५०० मेगावॉटचे दोन वीजनिर्मिती संच उभारण्यात येत आहेत. या प्रकल्पांचे काम वेगवेगळ्या टप्प्यांवर असून, २००९ ते २०१२ या काळात ते सुरू होतील.

आगामी काळात ५,८४० मेगावॉट क्षमतेचे प्रकल्प उभारण्याचे नियोजन "महानिर्मिती"ने केले आहे. त्याअंतर्गत उरण येथे गॅसवर आधारित १२२० मेगावॉटचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यामध्ये ८१४ मेगावॉटचा एक; तर ४०६ मेगावॉटचा दुसरा संच असेल. धुळ्यातील दोंडाईचा येथे सुपर क्रिटिकल तंत्रज्ञानाचा वापर करून ६६० मेगावॉटचे दोन संच असा १३२० मेगावॉटचा एक प्रकल्प; तर ६६० मेगावॉटचे तीन संच असा १९८० मेगावॉटचा आणखी एक प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्याचबरोबर लातूर येथे "भेल"सह १३२० मेगावॉटचा संयुक्त प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

नवीन प्रकल्पांच्या उभारणीबरोबरच जुने झालेले वीजनिर्मिती संच बदलून, त्या जागी अधिक क्षमतेचे नवीन संच बसविण्याचा कार्यक्रमही आखण्यात आला आहे. त्याअंतर्गत भुसावळ येथे ५५ मेगावॉटचा संच काढून, तेथे २५० मेगावॉटचा संच बसविण्यात येईल. त्याचबरोबर पारस येथील ५५ मेगावॉटचा संच काढून, भुसावळ येथे २५० मेगावॉटचा नवीन संच बसविण्यात येईल. त्यातून ३९० मेगावॉटची क्षमतावाढ होईल. तसेच कोराडी येथील जुने संच बदलून तेथे टाकण्यात येणाऱ्या नवीन संचामुळे १५६० मेगावॉटची क्षमतावाढ होईल. सध्याच्या नियोजनानुसार २०१४ अखेरपर्यंत हे सारे एकूण ११ हजार मेगावॉट क्षमतावाढीचे प्रकल्प कार्यान्वित होतील, असे वेळापत्रक आखण्यात आले आहे.

(http://beta.esakal.com/2009/08/19220713/maharashtra-new-electricity-pr.html)

# संदर्भ ३

२० ऑगस्ट २००९, म.टा.

**वीज आली रे अंगणी!**

म. टा. खास प्रतिनिधी - 20 Aug 2009, 0201 hrs IST

लोडशेडिंग उच्चाटनासाठीच्या निरनिराळ्या प्रयत्नांपैकी राज्याच्या मालकीच्या प्रत्यक्ष सुरू झालेल्या १२ प्रकल्पांतून डिसेंबर-२०१४ पर्यंत टप्प्याटप्प्याने ११ हजार मेगावॉट वीज मिळणार असून त्याची सुरुवात येत्या नोव्हेंबरपासून होणार आहे.

परळीच्या विस्तार प्रकल्पातून नोव्हेंबरमध्ये २५० मेगावॉट तर डिसेंबरमध्ये पारसमधून २५० मेगावॉट वीज उपलब्ध होईल. जानेवारी २०१२ पर्यंत परळी, पारससह खापरखेडा, भुसावळ, चंदपूर आदी प्रकल्पांची कामे पूर्ण होऊन ३२१० मेगावॉट वीज मिळणार आहे. भूसावळ आणि पारस येथे ५०० मेगावॉटचे प्रकल्प जुन्या प्रकल्पांची जागा घेणार असून त्यांच्या मूळ क्षमतेत वाढ होणार आहे. हे प्रकल्प अनुक्रमे ऑगस्ट २०१२ आणि जून २०१३ पर्यंत कार्यान्वित होतील. कोराडीत १५६० मेगावॉट प्रकल्पासाठी जमीन संपादन, पाणी आणि कोळशाची व्यवस्था पूर्ण झाली. त्यामुळे तेथे नुकतेच भूमिपूजनही करण्यात आले. या प्रकल्पातून नोव्हेंबर २०१३ आणि मे २०१४ मध्ये ६६० मेगावॉटचे दोन संच कार्यान्वित होतील. तर ६६० मेगावॉटचा बदली संच नोव्हेंबर २०१४ मध्ये पूर्ण होण्याची शक्यता 'महानिमिर्ती'चे एमडी आणि ऊर्जा सचिव सुब्रत रथो यांनी व्यक्त केली.

उरणमध्ये ८१४ मेगावॉटचा प्रकल्प जून २०१२ मध्ये, ४०६ मेगावॉटचा प्रकल्प सप्टेंबर २०१२ मध्ये पूर्ण होईल. जमीन ताब्यात असून गॅस पुरवठ्यासाठी केंदाने तत्त्वत: मान्यता दिल्याने शनिवारी प्रकल्पाचे भूमिपूजन होत असल्याचे ऊर्जामंत्री सुनील तटकरे यांनी सांगितले.

धुळ्यातील दोंडाईचा आणि लातूर हे दोन प्रकल्प नुकतेच मंजूर झाले असून त्यांच्याकडून २०१४च्या शेवटच्या टप्प्यात एकूण ४६२० मेगावॉट वीजनिमिर्ती होऊ शकेल.

*** ... तर मुंबईला वीज देऊ!**

महानिमिर्तीचे प्रकल्प, केंदीय प्रकल्प आणि खासगी कंपन्या यांच्याकडून नोव्हेंबर महिन्यापासून टप्प्याटप्प्याने मिळणाऱ्या विजेमुळे राज्यातील विजेचा प्रश्ान् २०१२ पर्यंत निकालात निघणार आहे. २०१४ पर्यंत राज्य विजेच्या क्षेत्रात सरप्लस निमिर्ती करणारे राज्य होईल. तशी स्थिती आल्यावर मुंबईत टाटा आणि रिलायन्स इन्फ्राच्या बरोबरीने स्पधेर्त उतरून कमी खर्चाची वीज मुंबईकरांनाही उपलब्ध करू शकू, असा विश्वास ऊर्जामंत्री सुनील तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

सुमारे २१७० कोटी खर्चाचा खापरखेडा प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. ५०० मेगावॉटच्या या प्रकल्पासाठी महानिमिर्तीच्या ताब्यातील ६० हेक्टर जमीन वापरण्यात येत आहे. पाण्यासाठी पेंच प्रकल्पातून तजवीज करण्यात आली आहे. नॅचरल ड्राफ्ट कुलींग टॉवर ही अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित रचना राज्यात प्रथमच केली जात आहे. राख विसर्जनाचा परिणाम आसपासच्या परिसरावर होऊ नये म्हणून चिमणीच्या धुरांड्याची उंची २७५ मीटर ठेवण्यात आली आहे. या प्रकल्पाचे सुमारे ७५ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती 'महानिमिर्ती'च्या अधिकाऱ्यांनी दिली

(http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/4912759.cms)

# संदर्भ ४

म.टा. २१ ऑगस्ट २००९

**नाशिकला ५०० मेगावॉट वीज प्रकल्प**

म. टा. वृत्तसेवा। नाशिक - 21 Aug 2009, 0156 hrs IST

विजेची मागणी व पुरवठ्यातील तफावत आणि कालबाह्य झालेल्या एका वीजनिमिर्ती संचाच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या एकलहरे औष्णिक विद्युत निमिर्ती केंदात ५०० मेगावॉट वीजनिमिर्ती प्रकल्पाची योजना असून, त्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवण्यात आला आहे.
वीजनिमिर्ती केंदातील दोन संच चाळीस वर्षाहून अधिक जुने असल्याने त्यावरील खर्चही मोठा आहे. त्यातून आजही पूर्ण क्षमतेने विजनिमिर्ती होत असली तरीही उत्पादन व खर्चाचा विचार करता त्या ठिकाणी नव्या यंत्रणांची गरज आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक व्यवस्थापनाने अडीचशे मेगावॉट क्षमतेचे दोन प्रकल्प बसविण्याची मागणी केली आहे. राज्य सरकारच्या मान्यतेनंतरच विस्तार शक्य होणार आहे. सरकारकडून लोडशेडींग कमी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न सुरू असल्याने त्याचाच एक भाग म्हणून या प्रस्तावाला मान्यता मिळण्याची शक्यता आहे.

(http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/4916540.cms)

# संदर्भ ५

म.टा. ६ जून २००९

**पुढच्या वर्षीपर्यंत 'दाभोळ' पूर्ण क्षमतेने**

म. टा. खास प्रतिनिधी - 6 Jun 2009, 0444 hrs IST

सध्या निर्मिती ९५० मेगावॉट - राज्याच्या वीज स्थितीत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची क्षमता असलेला रत्नागिरी गॅस विद्युत अर्थात दाभोळ प्रकल्प (१,८५० मेगावॉट) २०१० सालापर्यंत संपूर्ण क्षमतेने चालवता येईल, अशी शक्यता 'एनटीपीसी'चे अध्यक्ष आणि एमडी आर. एस. शर्मा यांनी शुक्रवारी बोलून दाखवली. राज्याला सध्या एनटीपीसीकडून २७८५ मेगावॉट वीज मिळते, त्यातही टप्प्याटप्प्याने वाढ होणार असल्याचे शर्मा यांनी स्पष्ट केले.

एनटीपीसीच्या विविध योजनांच्या प्रगतीची माहिती देण्यासाठी आर. एस. शर्मा मुंबईत आले होते. दाभोळ प्रकल्पासंदर्भातील गॅसचा पुरवठा, परवानग्या आदी गोष्टींबाबतची चर्चा झाली आहे. दुरुस्ती आणि देखभालीचा करारही अंतिम टप्प्यात आहे. सध्या ९०० मेगावॉटपर्यंत वीजनिमिर्ती होते. निरनिराळे नवीन प्रकल्प मिळून सध्या १८ हजार मेगावॉट वीजनिमिर्ती करण्याचे उद्दिष्ट एनटीपीसीने ठेवले असल्याचे शर्मा यांनी सांगितले.

ऊर्जा क्षेत्रात वर्षाला सुमारे ३० हजार मेगावॉटहून जास्त वीजनिर्मिती करणाऱ्या एनटीपीसीकडून या आथिर्क वर्षात १७ हजार ७०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. यावषीर् त्यांनी ३३०० मेगावॉट नवीन वीजनिमिर्तीचे लक्ष्य ठेवले असून पुढील वषीर् ते लक्ष्य पाच हजार मेगावॉटचे असेल. नागपूरस्थित मौदा या एक हजार मेगावॉट क्षमतेच्या प्रकल्पाच्या भूमिसंपादनाचे काम झाले असून बॉयलर उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. तर, सोलापुरातील १३२० मेगावॉट क्षमतेच्या प्रकल्पाचे फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस भूमिपूजन झाले. तेथे सध्या पायाभूत सुविधा उभारण्याचे काम सुरू असून गाडगीळ फॉर्म्युल्यानुसार या प्रकल्पातील दहा टक्के वीज राज्याच्या वाट्याला येणार आहे. मात्र त्यासाठी आणखी किमान तीन वर्षांचा कालावधी लागणार असल्याची माहिती शर्मा यांनी दिली.

(http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/4623570.cms)

# संदर्भ ६

लोकसत्ता १२ ऑगस्ट २००९

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रकल्पांविरोधात सर्वपक्षीय फोरमची स्थापना**

सावंतवाडी, १२ ऑगस्ट/ वार्ताहर

सिंधुदुर्ग जिल्ह्यातून मायनिंग, औष्णिक प्रकल्पाच्या विरोधात चलेजाव करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी फोरमची स्थापना केली आहे. प्रा. गोपाळ दुखंडे हे या फोरमचे निमंत्रक असून त्यांनीच ही माहिती पत्रकार परिषदेत दिली.

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे नैसर्गिक सौंदर्य भकास करून टाकणाऱ्या मायनिंग, औष्णिक वीज प्रकल्पांना 'चलेजाव'चा नारा देण्याचे सर्वपक्षीय नेत्यांमध्ये एकमत झाले. ही बैठक कुडाळ येथे झाली. या फोरमच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा निर्धार करण्यात आला.

मुंबईत चाकरमान्यांचा मोठा मेळावा घेऊन जनजागृती करण्याचेही बैठकीमध्ये निश्चित करण्यात आले. जिल्हावासीयांना नको असणारे प्रकल्प कोणाच्या हट्टाखातर उभारून जिल्ह्याच्या निसर्गसौंदर्यास बाधा आणणाऱ्या कृतीला विरोध करण्याचेही निश्चित करण्यात आले.

शिवसेनेचे आमदार शिवराम दळवी, परशुराम उपरकर, प्रा. गोपाळ दुखंडे, काँग्रेसचे नेते पुष्पसेन सावंत, सेना जिल्हाध्यक्ष वैभव नाईक, राष्ट्रवादीचे प्रभारी जिल्हाध्यक्ष संदेश पारकर, माजी मंत्री प्रवीण भोसले, राष्ट्रवादी कुडाळ तालुका अध्यक्ष बाळ कनयाळकर, राष्ट्रवादी युवक राज्य उपाध्यक्ष अमित सामंत, शेतकरी नेते वसंत केसरकर, भाजप उपाध्यक्ष प्रमोद जठार, अवधूत मालवणकर, अतुल काळसेकर, डॉ. जयेंद्र परुळेकर, शिवराज्य जिल्हाध्यक्ष शिवाजी सावंत, विलास हडकर, स्वतंत्र कोकण राज्याचे प्रा. महेंद्र नाटेकर, जनता दलाचे उपाध्यक्ष प्रभाकर नारकर, कोकण विकास आघाडीचे मोहन केळुसकर आदी उपस्थित होते.

मायनिंग व औष्णिक प्रकल्पास विरोध करणाऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांचा अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला. मुंबई व गावागावांत जनजागृती करण्यासाठी सर्वांनी चळवळ उभारण्याचे निश्चित करण्यात आले.

(http://www.loksatta.com/index.php?option=com_content&view=article&id=353:2009-08-12-17-14-10&catid= 25:2009-07-09-02-01-06&Itemid=2)

# संदर्भ ७

म.टा. २६ जूलै २००९

**ठोसेघरच्या पाण्यावर वीजनिमिर्ती**

म. टा. वृत्तसेवा। कराड

सातारा जिल्ह्यातील ठोसेघरचा धबधबा आता वीजनिमिर्ती केंदही बनणार आहे. ठोसेघरसह आठ ठिकाणी जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा निर्णय सरकारच्या विचाराधीन असून त्यातून सुमारे १८.५ मेगावॉटची वीजनिमिर्ती होणार आहे.

जलस्त्रोताद्वारे विजेची निमिर्ती करण्यावर सरकारने भर दिला आहे. २३३ मेगावॉट विजनिमिर्ती शक्य असलेल्या ४७ प्रकल्पांची स्वतंत्र यादी ३१ मे रोजी सरकारकडून जाहीर करण्यात आली आहे. सध्याचे पाटबंधारे प्रकल्प व नद्यांवरील स्त्रोत लक्षात घेऊन परदेशी तसेच देशातंर्गत गुंतवणूकदारांसाठी ४१८ मेगावॉट वीजनिमिर्तीचे १२१ प्रकल्प सरकारकडे प्रस्तावित आहेत. सातारा जिल्ह्यातील आठ जलविद्युत प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे. यातून १८.५ मेगावॉट विजेची निमिर्ती होणार आहे. तारळी-६ , कुडळी-१.२, वांग-१.५, उत्तरमांड-०.५, गुरेघर-०.४ तसेच खोडशी, गिरवी व ठोसेघर येथून प्रत्येकी ८ मेगावॉटची वीजनिमिर्ती होणार आहे.

उत्तरमांड, गुरेघर, वांग, तारळी, कुडाळी हे मध्यम प्रकल्प आहेत. गिरवीजवळ धुमाळवाडी आणि ठोसेघर येथे धबधब्यांच्या पाण्यावर जलविद्युत प्रकल्पा होणार असल्याने या भागाच्या विकासाला चालना मिळणार असून लोडशेडिंग कमी होण्यास मदत होणार आहे.

तारळी, कुडाळी, वांग, उत्तरमांड, गुरेघर या प्रकल्पांसाठी यापूवीर्च जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित केलेले आहेत. त्यांना सरकारची मंजुरी मिळालेली नाही.

(http://maharashtratimes.indiatimes.com/rssarticleshow/4820932.cms)

# संदर्भ ८

**जलविद्युत प्रकल्प बीओटी तत्त्वावर?**

म. टा. खास प्रतिनिधी - 18 **Aug** 2009, 0147 **hrs IST**

माळशेज (६०० मेगावॉट), हुंबालीर् (४०० मेगावॉट) आणि चिखलदरा (४०० मेगावॉट) या जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील तीन जागांवर बीओटी तत्त्वावर जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा विचार सुरू असून घाटघर प्रकल्पाचा दुसरा संच डिसेंबर अखेरपर्यंत कार्यान्वित करण्यात येणार आहे!
घाटघर जलविद्युत प्रकल्पाचा पहिला संच 'महानिमिर्ती'कडे हस्तांतरित करण्यासाठी 'सह्यादी'वर झालेल्या समारंभात जलसंपदा मंत्री अजित पवार यांनी राज्यातील जलविद्युत क्षेत्रात सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. विजेच्या टंचाईमुळे 'ऑफ पीक' काळात वीज मिळत नसल्याने मोठ्या प्रकल्पांचे काम मागे पडले होते. आता टप्प्याटप्प्याने राज्यातील वीजस्थिती सुधारत असल्याने हे प्रकल्प मार्गी लागू शकतात. त्यासाठी केंद सरकारही निधी देऊ शकेल. माळशेज, कोयनाचा पाचवा टप्पा असेलेले हुंबालीर् आणि चिखलदरा या तीन प्रस्तावित जागा आहेत. चिखलदराची जागा व्याघ्र प्रकल्पात येत असल्याने त्याच्या परवानगीसाठी प्रयत्न करावे लागतील, असे पवार यांनी स्पष्ट केले.
घाटघरच्या १२५ मेगावॉटचा पहिल्या संचाचे हस्तांतरण झाले आहे. तर दुसरा १२५ मेगावॉटचा संच डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावाच लागेल. त्यासाठी 'भेल'नेही मदतीचे आश्वासन दिल्याचे पवार म्हणाले.
वीजनिमिर्तीपेक्षा पाणी चढविण्यासाठी बरीच वीज लागत असल्याचे निदर्शनास आणताच पवार यांनी, 'पीक अवर्स'मध्ये एरवी बाजारातून प्रसंगी दहा ते बारा रुपये युनिटने वीज खरेदी करावी लागते. मात्र, स्वत:ची जलविद्युत दोन रुपयांत उपलब्ध होते आणि फ्रिक्वेन्सी राखण्यात राज्याला यश मिळते, हा उपयोग त्याच्यापेक्षा जास्त महत्त्वाचा आहे, असे सांगितले.
जलसंपदा विभागाने निर्धारित वेळेत काम केल्याने राज्याची विजेची गरज भागविण्यात आणखी एका प्रकल्पाचे योगदान मिळाले आहे. तसेच, धरणाच्या बांधकामासाठी ६० टक्के औष्णिक प्रकल्पातील राखेचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे प्रदूषणाची समस्या कमी झाल्याचे ऊर्जामंत्री सुनील तटकरे यांनी सांगितले. त्यावर, कोणत्याही धरणाच्या बांधकामात १५ ते २० टक्के फ्लाय अॅश वापरण्याचा धोरणात्मक निर्णय झाल्याची माहिती अजित पवार यांनी दिली. घाटघर येथे पर्यटन केंद्राचाही विकास केला जाणार असल्याचे तटकरे म्हणाले.

(http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/4904277.cms)

# संदर्भ ९

**State keen on tying up with NPC for N-power**

Prafulla Marpakwar, TNN - 24 June 2009, 03:05am IST

MUMBAI: State energy minister Sunil Tatkare on Tuesday said the state government was keen on a joint venture with the Nuclear Power Corporation
(NPC) for future capacity addition. "We are keen on a joint venture. We will extend all cooperation for the proposed venture,'' Tatkare said at the National Conference of Energy Ministers in New Delhi.

According to reports, the NPC has identified Jaitapur village in coastal Ratnagiri for setting up a 5,000 MW project in joint venture. However, it is yet to decide if the NPC will join hands with the state-run Maharashtra Power Generation Corporation, which Tatkare heads.

Speaking about a `Power surplus India by 2012' (the theme of the conference), Tatkare was optimistic, saying that his government had already launched a series of major power projects to achieve the target set by the Centre. "We are moving in the right direction. We are set to complete the on-going projects in a time-bound period to reach the goal of surplus power by 2012,'' Tatkare said.

The minister said during the current year, following commissioning of the Parli and Paras thermal power plants, there was net capacity addition of 500 MW, while next year, another 500 MW will be added.

Secondly, Tatkare said if adequate gas was available at affordable price, the Uran gas turbine power station will be functional by 2011-12. As a result, there will be a fresh capacity addition of 3,524 MW. In the 12th plan, it has been proposed to create a new capacity of 4,676 MW by expansion of the Chandrapur, Bhusaval, Paras, Koradi and Dondaicha thermal power plants.

"In view of the steps taken by us, by and large, there is drastic cut in the load-shedding period. In rural areas, it has been reduced by three hours and in urban areas by one-and-a-half hours,'' Tatkare said.

He said the Bharat Heavy Electricals Limited (BHEL) should adhere to the schedule for supply of major equipment, so that there was no delay in execution of major power projects. Senior energy officials felt that with the induction of former chief minister Vilasrao Deshmukh as the minister for heavy industries, Maharashtra will certainly benefit, at least when it comes to supply of BHEL equipment. Tatkare also asked the Centre to supply more coal from the state-run enterprises.

(http://timesofindia.indiatimes.com/Cities/Mumbai/State-keen-on-tying-up-with-NPC-for-N-power/

articleshow/4694333.cms)

## संदर्भ १०

**Economic Survey of Maharashtra 2008-09, pg 141**

### Co-generation of Electricity by Sugar Factories

9.23 There are 185 sugar factories in the State with potential of about 1,250 MW capacity of power generation. MAHADISCOM has signed energy purchase agreement with 40 sugar factories (projects) for co-generation having capacity of 464 MW, of which 28 projects of 228 MW capacity have been commissioned. Out of the commissioned projects, 23 projects of 202 MW capacity were in operation by the end of December, 2008. During 2007-08, the energy generated by these projects was 155 MKWH.

## संदर्भ ११

**Economic Survey of Maharashtra 2008-09, pg 138**

**Table 9.5 Status of the Private Projects**

| Name of Company | Location | Capacity in MW | Status by end of March, 2009 |
|---|---|---|---|
| TATA Power | Deharand & Trombay | 1,500 | In first stage the unit of 250 MW is commissioned in March, 2009 |
| Jindal Power Corporation | Jaigad | 1,000 | In first stage, the unit of 300 MW is expected to commission in September, 2009 |
| CIPCO | Bhadravati | 2,000 | Applied for land to MIDC |
| GMR Energy | Dapoli | 1,000 | Selected new site near Dapoli which has been approved by State Govt |
| ESPAT Energy | Wave | 1,000 | Applied for land to MIDC |
| Reliance Energy | Shahapur | 4,000 | All necessary clearances are obtained and land acquisition is at advance stage |
| Spectrum Technology | -- | 500 | No progress |
| ESSAR | -- | 1,500 | No progress |

*Source* : Energy Department, Government of Maharashtra

# संदर्भ १२

State Transmission Utility Plan  for the year 2009-10 to 2013-14

## Table – 8.2   Proposed Year wise Generation Addition by IPP Plants

| SR. NO. | NAME OF APPLICANT | INSTALLED CAPACITY (MW) | MW ( EX – BUS GENERATION ) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2009-10 | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 |
| 1 | M/s Gupta Energy Pvt. Ltd.Tal. Ghugus, Dist.Chandrapur. | 2 X 60 MW= 120 MW | - | 108 | - | - | - |
| 2 | M/s Nagpur Energy Infrastructure Ltd.(Formerly Baidyanath Power &Mining), Tal. Bhadrawati Dist. Chandrapur.) | 250 + 250 + 500 =1000 MW | - | - | - | - | - |
| 3 | M/s Ideal Energy | 2 x 135MW= 270 MW | - | - | 243 | - | - |
| 4 | M/s Finolex Infrastructure Ltd. Dist. Ratnagiri | 2 x 500 MW = 1000 MW | - | - | - | - | 900 |
| 5 | M/s Patni Energy Ltd.Yeorawada, Dist.Pune. | 2 x 135 MW = 270 MW | - | - | 243 | - | - |
| 6 | M/s Emco Energy Ltd.Warora,Dist.Chandrapur | 2 x 135 MW = 270 MW | - | - | - | 243 | - |
| 7 | M/s Lloyd Metal  & Engineers Ltd. | 4 x 30MW = 120MW | - | 108 | - | - | - |
| 8 | M/s Wardha Power Company Pvt.Ltd, Unit-1 & 2 Warora,Dist.Chandrapur | 2 x 135 MW = 270 MW | 243 | - | - | - | - |
| 9 | M/s Ind-Barath Power (Konkan) Ltd. Tal Sawantwadi Dist.Sindhudurg. | 1 X 300 MW = 300 MW | - | - | - | - | - |
| 10 | M/s Wardha Power Company Pvt.Ltd, Unit-3 & 4 Warora,Dist.Chandrapur | 2 x 135 MW = 270 MW | - | 243 | - | - | - |
| 11 | M/s Reliance Industries Ltd. At Talegaon | 2 x 500 MW = 1000 MW | - | - | - | - | - |
| 12 | M/s Reliance Industries Ltd. At Shirur | 2 x 500 MW = 1000 MW | - | - | - | - | - |
| 13 | M/s Vidharbha Dist-Nagpur | 1 x 300MW= 300 MW | - | - | 270 | - | - |
| 14 | M/s Reliance Industries Ltd.,Nagothane | 345 MW | | - | - | - | - |
| 15 | M/s Indiabulls Real Tech Limited.Tal. Sinnar, Dist. Nasik. | 2 X 660 MW= 1320 MW | - | - | - | - | - |
| 16 | M/s Sophia Power Company Limited.At Nandgaon peth Ind.Area.Amravati | 2 X 660 MW= 1320 MW | - | - | - | 1184 | - |
| 17 | M/s Adani At Gondia | 3 X 660 MW= 1980 MW | - | 594 | 594 | - | - |
| 18 | M/s Abhijit MADC Nagpur Energy Pvt. Ltd.at Gumgaon Village, MIHA | 4 X 50 MW= 200 MW | - | 180 | - | - | - |
| 19 | Reliance Energy Ltd., at Shahapur | 2400 MW | - | - | - | - | - |
| 20 | Tata Power Company, at Dehrand | 2400 MW | - | - | - | - | - |
| 21 | JSWL  ( 300MW) | 300 MW | - | 270 | - | - | - |
| **Total** | | | **243** | **1503** | **1350** | **1427** | **900** |
| **Existing Generation** | | | **113** | **356** | **1859** | **3209** | **4636** |
| **Year wise Availability** | | | **356** | **1859** | **3209** | **4636** | **5536** |